दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -११८ | शुक्रवार दि.०२ जानेवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-118 | Friday, Dt.02 January 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# जनतेच्या पैशातून होणारी विकासकामे, दर्जेदार, गुणवत्तापूर्णच झाली पाहिजेत - उपमुख्यमंत्री अजित पवार

## बीड जिल्ह्याचा मागासलेपणा दूर करण्यासाठी १हजार ३६३ कोटी रुपयांच्या विकास कामांचे उद्घाटन करून नवीन वर्षाची सुरुवात

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य आहे. यासाठी सर्वांची सोबत आवश्यक आहे. भारतीय संविधान, कायद्याचा आदर करत बीडकरांनी दैनंदिन जीवनात बीडच्या विकासासाठी शिस्त पाळावी. जनतेच्या पैशातून होत असलेली विविध विकासकामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण होतील, यावर बारकाईने लक्ष द्यावे, अशा सूचनाही जिल्हा प्रशासनाला बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देवून नवीन वर्षाची सुरुवात बीड जिल्ह्याचा मागासनेपणा दूर करण्यासाठी तब्बल १३६३ कोटी रुपयांच्या विकास कामांचे उद्घाटन करून केली.

बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर जिल्ह्यातील १३६३ विकासकामांचे भूमिपूजन व पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. जिल्हा परिषद बीड अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतील विविध विकासकामांचे भूमिपूजन, टेनिस कोर्टाचे उद्घाटन श्री. पवार यांच्या हस्ते झाले. यासह प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत 'दिवाळी नवीन घरात' उपक्रमाचा समारोप, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांना टॅबचे वाटप, ध्वज निधी संकलनात बीड जिल्हा राज्यात प्रथम आल्याने सत्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळाही या एकाच ठिकाणी उपमुख्यमंत्री पवार यांच्या उपस्थितीत पार पडला.

या कार्यक्रमास सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार बजरंग सोनवणे, सर्वश्री आमदार विक्रम काळे, प्रकाश सोळंके, सुरेश धस, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, बीडच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान, जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत उपस्थित होते.

श्री.पवार म्हणाले, नवीन इंग्रजी वर्षाच्या सर्वांना शुभेच्छा. येत्या नववर्षात आपणास बीडच्या विकासात अधिक भर घालायची आहे. या वर्षाच्या सुरूवातीलाच १३६३ विकासकामांनी सुरूवात झाली आहे, ही आनंदाची बाब आहे. बीड जिल्ह्यात एकाच वेळेस एवढ्या विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन होत आहेत, त्यामध्ये आपणा सर्वांची साथ असल्याचेही ते म्हणाले.

जिल्हा परिषद, जिल्हा सैनिक कार्यालय व इतर कार्यालयांच्या माध्यमातून जिल्ह्यात चांगले काम होत आहे. त्याला जनतेचीही साथ आहे, त्यामुळे येथील जनतेला जनतेला धन्यवाद देतो, असेही पवार म्हणाले. यासह त्यांनी जिल्ह्यात देण्यात आलेल्या भरीव निधीबाबत सविस्तर माहिती दिली. यामध्ये त्यांनी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी निधी सह शासन मान्यता दिल्याचे आवर्जून सांगितले.

बीड-परळी रेल्वे, भूसंपादनाची आवश्यकता, रेल्वेचे इलेक्ट्रीफिकेशन, ऊसतोड कामगारांसाठी उर्वरित पाच तालुक्यात वस्तीगृहे, अंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयाचा बृहत आराखडा, सीट्रीपल आयटी, आरोग्य सुविधा वाढविण्यासाठी नियोजन, रेशीम उत्पादन भरभराटीसाठी सिल्क पार्क, विज्ञान उद्यान, तारांगण पार्क, पुरातन वास्तूंचे जतन, बीडसाठी दरदिवसाला पाणी मिळावे यासाठीचे नियोजन आदी बाबींवरही त्यांनी उपस्थितांना माहिती दिली.

सहकार मंत्री पाटील म्हणाले, केंद्र, राज्यपातळीवरील सहकार विभागाचे काम उत्तम आहे. राज्याने सहकार क्षेत्रात भरीव

(उर्वरीत पान २ वर)



### नियोजनबद्ध विकास: १३६३ कामांचा एकाच वेळी प्रारंभ

जिल्हा वार्षिक योजनेच्या इतिहासात प्रथमच अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने कामांची आखणी करण्यात आली आहे. डिसेंबर अखेर ९०% कामांना प्रशासकीय मान्यता देऊन, त्यांचे सर्वेक्षण आणि तांत्रिक अंदाजपत्रके पूर्ण करण्यात आली आहेत. यामुळे आज एकाच वेळी जिल्हा परिषदेकडील १००५ आणि राज्य यंत्रणेकडील ३५८ अशा एकूण १३६३ कामांचा भूमीपूजन सोहळा पार पडला. यामुळे सर्व विकासकामे विहित वेळेत पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

### विक्रमी ५० हजार घरकुलांचे स्वप्न साकार

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत (ग्रामीण) 'सर्वांसाठी घरकुल' हे उद्दिष्ट गाठण्यासाठी बीड जिल्हा परिषदेने जुलै २०२५ पासून दिवाळी नवीन घरकुलात हा विशेष उपक्रम राबवला होता. या उपक्रमांतर्गत दिवाळीपर्यंत ५०,००० घरकुले पूर्ण करण्याचा ऐतिहासिक टप्पा जिल्ह्याने गाठला आहे. या यशामध्ये मोलाची कामगिरी करणाऱ्या ६ पंचायत समित्या, २ ग्रामपंचायती आणि गृहनिर्माण अभियंत्यांचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला.

### तब्बल १३६३ कामांचे भूमीपूजन..

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत तब्बल १३६३ कामांचे भूमीपूजन करण्यात आले यासह इतर विकासकामांचेही उद्घाटन, पुरस्कार वितरण श्री पवार यांच्या हस्ते पार पडले.

### शिक्षण आणि क्रीडा क्षेत्राला बळ

आदर्श शिक्षक पुरस्कार : गेल्या तीन शैक्षणिक वर्षांत (२०२२-२३ ते २०२४-२५) उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ६४ प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. यापुढे हे पुरस्कार दरवर्षी देण्यात यावेत, अशा सूचना श्री. पवार यांनी प्रशासनाला केल्या.

### ओबीसी प्रवर्गातील २९३ विद्यार्थ्यांना टॅबचे वितरण

महाज्योती संस्थेमार्फत ओबीसी प्रवर्गातील २९३ विद्यार्थ्यांना टॅब उपलब्ध करून देण्यात आले असून, त्यातील ५ विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात टॅब वाटप करण्यात आले.

# पहाटेपर्यंत ऑपरेशन न्यू ईयर पोलीस अधीक्षकांनी राबवले

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील नागरिकांनी नविन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहात व चांगल्या वातावरणात साजरे करावे यासाठी बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत यांच्या संकल्पनेतून बीड जिल्ह्यात दिनांक २९/१२/२०२५ रोजी पासून ते दिनांक ०१/०१/२०२६ च्या पहाटेपर्यंत ऑपरेशन न्यू ईयर राबविण्यात आले. या उपक्रमाचा मुळ उद्देश बीड जिल्ह्यातील नागरिकांची / महिलांची सुरक्षा व नविन वर्षाचे स्वागत आनंदाच्या वातावरणात करावा यासाठी

(उर्वरीत पान २ वर)



थर्टीफर्स्टला बीड जिल्ह्यात कुठेही कायदा व सुव्यवस्थेला गालबोट लागले नाही

# सहकार भवनाचे उपमुख्यमंत्र्यांनी केले भूमीपूजन

## बीड शहरातील जालना मुख्य रस्त्यावर होणार ५ मजली इमारत

बीड ।प्रतिनिधी

शहरातील मुख्य रस्त्यालगत उभारण्यात येणा-या सहकार भवन इमारतीचा भूमीपूजन सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पार पडला. यावेळी राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

येथील जालना रोडवर ही इमारत बांधण्यात येईल यासाठी १४ कोटी ९८ लक्ष ७९ हजार रुपये निधीची मान्यता देण्यात आली आहे. तळमजला पार्कींग व त्यावर ४ मजले अशी ही भव्य इमारत असेल. इमारतीचे एकूण क्षेत्र २३०५.१९ चौरस मीटर इतके राहणार आहे.या इमारतीमध्ये सर्व सहकार संबधित कार्यालये एकत्र येणार आहेत.

आजच्या या भूमीपूजन सोहळयास जिल्हयाचे खासदार बजरंग सोनावणे, विधान परिषद सदस्य विक्रम काळे तसेच आमदार विजयसिंह पंडीत, संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतूल चव्हाण, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सतीष तोटावर, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे, विशेष लेखा परिक्षक धनंजय चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती होती.



# हातभट्टीची दारु तयार करुन तिचा चोरटा व्यापार करणाऱ्या इसमाची एमपीडीए कायद्याअंतर्गत हर्सूल हर्सल कारागृहात रवानगी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन चझऊ- कायद्या अंतर्गत विविध हेड खाली बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे.

त्या अनुषधांने पोनि पो.स्टे. माजलगांव शहर यांनी दिनांक १६.१२.२०२५ रोजी इसम नाने भगवान कटाळु मेंडके वय ५२ वर्षे रा. शिवाजीनगर माजलगांव जि.बीड याचे विरुद्ध चझऊ- कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बोड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसमा विरुद्ध पोलीस ठाणे माजलगांव शहर येथे हातभट्टीची दारू तयार करणे, ताब्यात बाळगणे, चोरटी विक्री करणे, हातभट्टीच्या दारुची

(उर्वरीत पान २ वर)



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

संपादकीय....

## ‘बाहुबली’चे यशस्वी उड्डाण

भारतीय अवकाश संशोधन संस्था ‘इस्रो’ने ६ हजार १०० किलो वजनाच्या उपग्रहाचे अवकाशात यशस्वी प्रक्षेपण करून नवा इतिहास निर्माण केला आहे. इस्रोच्या ‘बाहुबली’ अग्निबाणाच्या सहाय्याने हे प्रक्षेपण बुधवारी सकाळी ८ वाजून ५५ मिनिटे ३० सेकंदांनी श्रीहरीकोटा येथील प्रक्षेपण केंद्रावरून करण्यात आले. या उपग्रहाचे नाव ‘ब्ल्यूबर्ड ब्लॉक-२’ असे आहे. इस्रोने आतापर्यंत प्रक्षेपित केलेल्या उपग्रहांमध्ये हा सर्वाधिक वजनाचा आहे. हा उपग्रह दूरसंचार सेवेसाठी असून तो निम्नकक्षेत परिभ्रमण करणारा सर्वांत वजनदार उपग्रह आहे. या उपग्रहाची निर्मिती अमेरिकास्थित ‘एएसटी स्पेसमोबाईल’ या खासगी कंपनीने केली आहे. इस्रोचे ‘एलव्हीएम ३-एम-६’ या अग्निबाणाने या उपग्रहाला पूर्वनिर्धारित कक्षेत सुस्थिर केले आहे. या अग्निबाणाच्या श्रेणीला ‘बाहुबली’ असे संबोधले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या महत्त्वपूर्ण कामगिरीसाठी इस्रोचे अभिनंदन केले असून इस्रोचे हे यश आत्मनिर्भर भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे असे आपल्या संदेशात म्हटले आहे.

पूर्वनिर्धारित कार्यक्रमानुसार या उपग्रहाचे प्रक्षेपण बुधवारी सकाळी ८ वाजून ५४ मिनिटांनी केले जाणार होते. परंतु अवकाशातील परिस्थिती अनुकूल नसल्याने प्रक्षेपण ९० सेकंद विलंबाने करण्यात आले. अवकाशात उपग्रह प्रक्षेपणाच्या मार्गात ‘अवकाश कचरा’ आढळल्याने तो दूर होईपर्यंत प्रक्षेपण लांबविण्यात आले होते. इस्रोची व्यापारी शाखा ‘न्यू स्पेस इंडिया लिमिटेड’ आणि अमेरिकेची खासगी उपग्रह निर्मिती कंपनी ‘एएसटी स्पेस मोबाईल’ यांच्यात झालेल्या करारानुसार या उपग्रहाचे प्रक्षेपण करण्यात आले आहे. या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण करून इस्रोने आपला पूर्वीचा विक्रम मोडीत काढला आहे. यापूर्वी इस्रोने ४ हजार ४०० किलो वजनाच्या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण केले होते. या नव्या उपग्रहात अत्यंत आधुनिक अशी दूरसंचार साधने स्थापित करण्यात आली असून त्यामुळे मोबाईलवरून संपर्क साधण्यासाठी जमिनीवर मनोरे(टॉवर्स) असण्याची गरज नाही. मनोराविरहित संपर्क यामुळे शक्य होणार आहे.

तसेच व्हीडीओ कॉल करण्यासाठीही हा उपग्रह उपयुक्त ठरणार आहे. या उपग्रहामुळे ४ जी आणि ५ जी ध्वनी आणि व्हीडीओ कॉल्स शक्य होणार आहेत. स्पेसमोबाईल या खासगी कंपनीने एक महत्त्वाकांक्षी योजना आखली असून या योजनेमुळे मनोराविरहित संपर्क शक्य होणार आहे. ही कंपनी ‘आकाशाधारित’ (स्पेस बेस्ड) सेल्युलर ब्रॉडबँड नेटवर्कची स्थापना करणार आहे. हे नेटवर्क व्यापारी आणि प्रशासकीय उपयोगासाठी असेल. तसेच ते ४ जी आणि ५ जी कॉल्स, संदेशवहन, स्ट्रीमिंग आणि विदासेवा (डाटा सर्व्हिस) यांच्यासाठी उपयुक्त असेल. भारताच्या अवकाश क्षेत्रातील कामगिरीतले हे भरीव यश आहे. भारताच्या अवकाश प्रवासातील हा देदीप्यमान क्षण आहे. या उपग्रहामुळे अवकाशातून सामान्य स्मार्टफोनवर थेट हाय-स्पीड इंटरनेट प्रवेश मिळेल. ब्ल्यूबर्ड ब्लॉक-२ हा एएसटी स्पेसमोबाईलच्या पुढील पिढीतील संप्रेषण उपग्रह मालिकेचा एक भाग आहे. हा उपग्रह जगभरातील अशा भागात मोबाईल कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी डिझाईन केला आहे जिथे ग्राऊंड नेटवर्क प्रवेश करण्यायोग्य नाही. या उपग्रहात २२३ चौरस मीटर (सुमारे २४००चौरस फूट) फेजड् अॅरे अँटेना आहे. ज्यामुळे तो पृथ्वीच्या कक्षेत कमी अंतरावर तैनात केलेला सर्वांत मोठा व्यावसायिक संप्रेषण उपग्रह बनला आहे.

हा उपग्रह सुमारे ६०० किलोमीटर उंचीवर पृथ्वीच्या कक्षेत तैनात केला जाईल. याआधी एलव्हीएम ३ ने चांद्रयान-२, चांद्रयान-३ आणि दोन वनवेब मोहिमा (एकूण ७२ उपग्रह) यशस्वीरीत्या प्रक्षेपित केल्या आहेत. हे रॉकेट भारताच्या अंतराळ क्षमतेचे प्रतीक आहे आणि भविष्यातील गगनयान मानवयुक्त मोहिमेसाठी देखील वापरले जाणार आहे. हे मिशन इस्रोच्या व्यावसायिक प्रक्षेपणासाठी एक नवीन मैलाचा दगड ठरेल. एएसटी स्पेसमोबाईल जगातील पहिले अंतराळ-आधारित सेल्युलर ब्रॉडबँड नेटवर्क तयार करत आहे, जे स्टारलिंकसारख्या सेवांशी स्पर्धा करेल.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले-लक्ष्मण ढवळे

भारतीय समाजामध्ये तेही पुरुषप्रधान देशांमध्ये आज स्त्री-पुरुष समानता ही भावना वाढीस लागत आहे मुलगा म्हणजे वंशाचा दिवा ही भावना कमी होऊन मुली मुलापेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाहीत हे त्यांनी दाखवून दिले आहे आज प्रत्येक स्त्री-पुरुषाच्या खांदाला खांदा लावून काम करत आहे.पण स्त्रियांमध्ये ही ऊर्जा आली कुठून याचा शोध घेतला तर त्याचे उत्तर म्हणजे स्त्रियांच्या उद्धार कर्त्या स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आज ३ जानेवारी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करत असताना त्यांनी केलेल्या महान कार्याची माहिती आजच्या माता भगिनींना ज्ञात होणे गरजेचे आहे म्हणून थोडक्यात त्यांनी केलेल्या कार्याचा आलेख.......सावित्रीबाई फुले यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे नेवसे पाटील यांच्या कुटुंबात ३ जानेवारी १८३१ साली झाला......



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले

सावित्रीबाई फुले यांचा सारा जीवनपट म्हणजे काटेरी वाटेवरचा प्रवास १८४० साली त्यांचा विवाह गोविंदराव फुले यांच्या मुलाबरोबर म्हणजे ज्योतिराव फुले यांच्याबरोबर झाला विवाहाच्या वेळी सावित्रीबाई यांचे वय अवघे ९ वर्ष होते तर ज्योतिरावांचे वय अवघे १३ वर्षे होते.एवढ्या लहान वयात देखील सावित्रीबाई खूपच समजदार होत्या हुशार होत्या. सामाजिक कार्यात त्यांनी ज्योतिरावांच्या खांद्याला खांदा देऊन अतिशय निर्भीडपणे साथ दिली ज्योतीरावांचे धगधगते विचार पेलणे आणि त्या विचारावर निष्ठेने व प्रामाणिकपणे सावित्रीबाई कार्य करत होत्या आणि याच त्यांच्या असामान्य गोष्टी आहेत, असंख्य दिन दलितांना त्यांनी प्रेम दिले मायेची ऊब दिली पतितांना व पीडित विधवांना खंबीरपणे आधार दिला सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या प्रशिक्षित महिला झाल्या. साधारणता १८० वर्षांपूर्वी महिलांना शिक्षणाचा अधिकार नव्हता अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये सावित्रीबाई फुले यांनी ज्योतिराव फुले यांच्या खंबीर आधारावर आपले स्त्रियांचा उद्धार करण्याचे कार्य अखंडपणे चालू ठेवून त्यास १ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथील भिडे वाड्यात पहिली मुलींची शाळा काढून मनुवाद्यांना जोरदार चपराक दिली आणि स्त्री शिक्षणाचा पाया रचला हे सर्व करत असताना सावित्रीबाईला खूप त्रास सहन करावा लागला सदाशिव पेठेतील टवाळखोरांनी त्यांना दगडाने मारहाण केली त्यांच्या अंगावर चिखल शेणाचा मारा केला परंतु सावित्रीबाई डगमगल्या नाहीत तर या टवळखोरांना चपलेने चोप दिला. पुण्यात शूद्रांच्या शाळेसाठी शिक्षक मिळणे खूप कठीण होते म्हणूनच ज्योतिरावन ने सावित्री बाईला शिकून शिक्षक केले आपण एवढा त्रास देऊन देखील ज्योतिबा व सावित्री आपणास जुमानत नाहीत म्हणून सदाशिव पेठेतील मनुवाद्यांनी ज्योतिरावांचे वडील व सावित्रीबाई चे सासरे गोविंदराव फुले यांना धमकावून ज्योती सावित्रीचे कार्य बंद करण्यास सांगितले ते जर हे कार्य बंद करत नसतील तर त्यांना घराबाहेर काढा अशी धमकी दिली या धमकीमुळे गोविंद रावांनी सावित्रीबाई व ज्योतिराव यांना घराबाहेर काढले. तरीही त्यांनी शिक्षणाचे काम सगुनाबाई व फातिमा शेख यांच्या सहकार्याने जोमाने सुरू केले सगुनाबाई व फातिमा शेख यांनी शिक्षण कार्यात सावित्रीबाई ला खूप मदत केली सावित्रीबाईंनी मुलांना पाटी पेन्सिल व इतर शैक्षणिक साहित्य मोफत दिले पुणे येथे शाळेसाठी जागा मिळणे अतिशय कठीण असताना देखील १९४८ ते १९५२ या चार ते पाच वर्षात पुण्यात व पुण्याच्या परिसरात ज्योतिरावंनी व सावित्रीबाईंनी १६ शाळा काढल्या सावित्रीबाईंनी त्यांच्या शाळेत एक निबंध स्पर्धा ठेवली त्याचा विषय होता वेद व धर्म त्या निबंध स्पर्धेत एका मातंग मुलीने आपल्या निबंधात लिहिले की भिक्षुक वर्ग म्हणतात की आमचीच सत्ता आहे, आम्हीच त्याचे अवलोकन करावे त्यावरून उघड दिसते की आम्हास धर्म पुस्तक नाही जर त्यांच्यासाठी वेद आहेत तर वेदाप्रमाणे आचरण करणे त्यांचा धर्म आहे आम्हास धर्म पुस्तक पाहण्याची मोकळीक नाही आम्हास धर्म पुस्तक नाही हे सर्व दिसत आहे हे भगवान तुझ्याकडून झालेले धर्म कोणता आहे हे सर्व एक मातंग मुलींनी सावित्रीबाई व ज्योतिराव फुले यांनी दिलेल्या योग्य शिक्षणामुळे येथील धर्म मार्तंडांना विचारून शिकली. २९ मे १८५२ यांच्या पुना ऑब्झर्वर या दैनिकात सावित्रीबाई फुले व ज्योतिराव फुले यांची मुक्तकंठाने स्तुती केली प्रशंसा केली १६ नोव्हेंबर १८५२ रोजी ब्रिटिश सरकारने शाल जोडी देऊन त्यांचा सत्कार केला व ही बातमी लंडनला पाठवली सावित्रीबाई व ज्योतिराव यांचे वैर ब्रह्मणांशी नव्हते तर त्यांचा ब्राह्मणी वृत्तिशी होते. विधवांच्या पुनर्विवाह साठी सावित्रीबाई यांनी मोठी सुधारणा घडवून आणली. त्याकाळी ब्राह्मण विधवेचे केश कापून मुंडन केले जात असे हे होऊ नये म्हणून त्यांनी नाभिक समाजाचा संप घडवून आणला होता. तसेच सर्व जाती धर्मातील उच्चनीच्या हा भेट नष्ट व्हावा यासाठी त्यांनी सार्वजनिक हळदी कुंकवाचा कार्यक्रम ठेवून उच्च निचतेची दरी कमी केली होती हा उत्सव अतिशय छान झाला होता, तत्कालीन प्रतिकूल परिस्थिती मध्ये सावित्रीबाई व ज्योतिराव यांनी बालहत्या प्रतिबंध ग्रह काढले त्यांनी आपल्या घराचा पाण्याचा हौद शूद्रांसाठी मोकळा केला धन तोडी येथे अन्न व पाण्यासाठी आश्रम बांधला.....

असे समाज उपयोगी कार्य करत असतानाच २७/२८ नोव्हेंबर १८९० चा काळा दिवस उगला आणि त्या दिवशी धगधगणारा क्रांतीसुर्य अस्ताला गेला. परंतु ज्योतिरावांच्या निधनानंतर देखील सावित्रीबाई आपले काम अविरत सात वर्ष करत राहिल्या १८९७ ला पुण्यात आलेल्या महाभयंकर अशा प्लेगच्या साथी मध्ये प्लेग्रस्थ रुणांची सेवा करता करताच १० मार्च १८९७ मध्ये या महान साध्वीची, क्रांतीज्योतीची ज्योत मावळली ज्योती सावित्री यांनी आम्हास रंजल्या गांजलेल्यांना भिकेचे जिणे नाकारण्याचे शिकवले गुलामगिरी सोडण्याचे शिकवले शिक्षणानेच तुमचा उद्धार होऊ शकतो हे शिकवले परंतु आज खरच आम्ही गुलामगिरी सोडली का? आम्ही खरंच स्वाभिमानी झालोत का?

आज ३ जानेवारी सावित्रीबाई ची जयंती त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन

जय ज्योती जय क्रांती

**लक्ष्मण ढवळे दादा**
मराठवाडा विभागीय अध्यक्ष
सत्यशोधक ओबीसी परिषद

## निष्ठा,संघर्ष आणि वैचारिक ठामपणाचे नेतृत्व – यशवंत खंडागळे

**माजी राज्यमंत्री तथा आमदार सुरेश आण्णा धस यांच्या नेतृत्वावर अखंड विश्वास ठेवून राजकीय व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले, अत्यंत एकनिष्ठ, शिस्तबद्ध व ध्येयवादी कार्यकर्ते म्हणून यशवंत खंडागळे यांचे नाव संपूर्ण तालुक्यात आदराने घेतले जाते. राजकारणात निष्ठा दुर्मिळ होत असताना, विचारांशी प्रामाणिक राहून नेतृत्वाशी एकरूप होणारे कार्यकर्ते म्हणून यशवंत खंडागळे हे एक वेगळे उदाहरण ठरले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीवर ठाम विश्वास असलेले यशवंत खंडागळे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर फोरमचे अध्यक्ष म्हणून समाजकारणाला राजकीय धार देण्याचे काम प्रभावीपणे करीत आहेत. सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि लोकशाही मूल्ये या बाबासाहेबांच्या विचारांना त्यांनी केवळ घोषणांपुरते मर्यादित न ठेवता, प्रत्यक्ष कृतीतून जनतेसमोर ठेवले आहे. त्यामुळेच फोरम हे केवळ संघटन न राहता, एक प्रभावी दबावगट म्हणून पुढे आले आहे.**



राजकीय लढाई असो वा सामाजिक संघर्ष, यशवंत खंडागळे हे नेहमीच अग्रभागी राहिले आहेत. प्रशासनातील ढिलाई, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रखडलेली कामे, तसेच वंचित समाजावर होणारे अन्याय याविरोधात त्यांनी आंदोलने, मोर्चे, रास्ता रोको, उपोषणे व निवेदनांच्या माध्यमातून प्रशासनाला जाब विचारला. सत्ता कोणाचीही असो, जनतेच्या हिताला बाधा येत असेल तर त्याविरोधात आवाज उठवणे, हीच त्यांची राजकीय भूमिका आहे.

कडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा रस्त्याच्या मध्यभागी उभारण्याचा प्रश्न हा त्यांनी केवळ स्थानिक प्रश्न म्हणून न पाहता, तो सामाजिक स्वाभिमान आणि राजकीय अस्तित्वाचा मुद्दा म्हणून मांडला. या प्रश्नावर त्यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठ पातळीवर सातत्याने पाठपुरावा केला असून, प्रशासनावर राजकीय दबाव निर्माण करण्याचे काम केले आहे. हा पुतळा म्हणजे केवळ स्मारक नसून, तो बाबासाहेबांच्या विचारांचा राजकीय केंद्रबिंदू ठरेल, अशी त्यांची ठाम भूमिका आहे.

यशवंत खंडागळे हे आष्टा ह. ना. गणामधून पंचायत समिती सदस्य म्हणून कार्यरत राहिले असताना त्यांनी विकासकामांना गती देत, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकाभिमुख राजकारणाचे उदाहरण घालून दिले. निधी वितरणात पारदर्शकता, कामांच्या अंमलबजावणीत गती आणि सर्वसामान्य जनतेशी थेट संवाद, ही त्यांच्या कार्यकाळाची वैशिष्ट्ये राहिली आहेत. पंचायत समितीच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्नांवर ठामपणे भूमिका घेतली. जो आमदार सुरेश आण्णा धस यांच्या लोकहिताच्या व विकासाभिमुख कामांना अडथळा निर्माण करेल, त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर फोरमच्या माध्यमातून राजकीय उत्तर दिले जाईल, हे त्यांचे तत्त्व त्यांच्या राजकीय निष्ठेचे आणि नेतृत्वावरील विश्वासाचे प्रतीक आहे. आमदार सुरेश आण्णा धस यांच्या नेतृत्वाखालील विकासराजकारणाला बळ देणे आणि विरोधकांच्या कारस्थानांना सडेतोड उत्तर देणे, हीच त्यांची भूमिका कायम राहिली आहे. त्यामुळेच ते आमदार धस यांचे अत्यंत विश्वासू, लढवय्ये आणि खंबीर सहकारी म्हणून ओळखले जातात.

आज गुरुवार, दिनांक १ जानेवारी २०२६ रोजी यशवंत खंडागळे यांचा वाढदिवस साजरा होत आहे. या निमित्ताने त्यांच्या आजवरच्या राजकीय वाटचालीकडे पाहिले असता, त्यांनी पद, प्रतिष्ठा किंवा लाभ यांपेक्षा विचार, निष्ठा आणि संघटनबळ यांना अधिक महत्त्व दिल्याचे स्पष्ट होते. कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, संघटन मजबूत ठेवणे आणि नेतृत्वाशी एकनिष्ठ राहणे, हीच त्यांची राजकीय ओळख आहे. या मंगलप्रसंगी त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याला मनापासून सलाम. त्यांचे नेतृत्व अधिक बळकट होवो, संघटन अधिक मजबूत होवो आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित लोकहिताचे राजकारण अधिक व्यापक स्तरावर पोहोचो, हीच अपेक्षा. शेवटी यशवंत खंडागळे यांना वाढदिवसानिमित्त दै. समर्थ राजयोग परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा....!!!

**– राजेंद्र लाड (आष्टी)**
मो. ९४२३१७०८८५

पान १ वरून...

**जनतेच्या पैशातून ....**

काम केले आहे, या सहकाराच्या माध्यमातून राज्याची ओळख जगभर आहे. येणाऱ्या काळामध्ये तरुणांच्या हाताला काम, महिलांचे सक्षमीकरण सहकार क्षेत्रातून मोठ्याप्रमाणात करण्यात येणार आहे. सहकारी चळवळीला अधिक गतिमान करण्यावर शासनाचा भर आहे. बीड जिल्ह्यामध्ये सहकार भवनाची आवश्यकता होती, म्हणून १४ कोटी ९८ लाख एवढ्या रकमेचे सहकार संकुल याठिकाणी उभे राहत आहे, ही आनंदाची बाब असल्याचे सांगत सहकार विभागाशी संबंधित १० कार्यालये एकाच ठिकाणी या संकुलामध्ये राहतील. त्यामुळे नागरिकांची सोय होणार असल्याचेही ते म्हणाले.

कार्यक्रमाची सुरवात दीप प्रज्वनाने व, राष्ट्रगीत, राज्यगीताने झाली. प्रास्ताविक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले. आभार जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांनी मानले.

टेनिस कोर्टाचे लोकार्पण

जिल्हा क्रीडा संकुल येथे ८० लक्ष रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या सुसज्ज सिन्थेटीक लॉन टेनिस कोर्टाचे लोकार्पण यावेळी करण्यात आले.

महत्त्वाच्या पायाभूत सुविधांची घोषणा

कार्यक्रमात वडवणी येथील स्व. महीपतराव गणपतराव कोठूळे शासकीय आयटीआयच्या इमारतीसाठी ८ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देऊन त्याचे भूमीपूजन करण्यात आले.

जिल्हाधिकारी, जिल्हा सैनिक अधिकारी यांचा सन्मान

ध्वजनिधी संकलनात बीड जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचा विशेष सत्कार या सोहळ्यात करण्यात आला.

**पहाटेपर्यंत ऑपरेशन...**

बीड शहर व जिल्ह्यातील इतर भागात प्रभावी नाकाबंदी, पेट्रोलिंग करुन दारु पिऊन भांडण करणारे, अवैध दारु विक्रेते, दारु पिऊन वाहन चालवणारे, विना हेल्मेट वाहन चालवणारे, ट्रिपल सिट वाहन चालवणारे, विना सिट बेल्ट वाहन चालवणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई, महिलांची छेडछाड रोखणे हा होता. तो या कारवाईमुळे यशस्वी झाला.

या ऑपरेशन न्यू ईयर अंतर्गत बीड पोलीसांनी विविध ठिकाणी प्रभावी पेट्रोलिंग, नाकाबंदी करून अवैध दारु विक्रेते, दारु पिऊन वाहन चालवणारे, विना हेल्मेट वाहन

पान १ वरून...

चालवणारे, ट्रिपल सिट वाहन चालवणारे, विना सिट बेल्ट वाहन चालवणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे.दिनांक २९/१२/२०२५ रोजी पासून बीड जिल्ह्यात १०३ एवढ्या ठिकाणी छापे टाकून ९,२६,७२५/- किमतीचा दारुचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच धारुर पोलीस स्टेशन ने नववर्षाच्या मध्यरात्री र ५,३२,५९४/- किंमतीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत गुटखा जप्त केला आहे. तसेच ३२ इसम हे दारु पिऊन वाहन चालवतांना मिळून आल्याने त्यांच्यावर मोटार वाहन अधिनियम कलम १८५ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ३०० वाहन चालकांवर कारवाई करून २,८४,२००/- ची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

याचा परिणाम म्हणून नववर्षाच्या पूर्व संध्येला व नववर्षाच्या सुरुवातीला बीड जिल्ह्यात कोणतीही मारामारी, गर्दी, अथवा इतर कोणतीही गंभीर घटना घडली नाही. तसेच एकही अपघात घडला नाही. ऑपरेशन न्यू ईयर १००% यशस्वी झाले असून त्यासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी अभिनंदन केले आहे.

**हातभट्टीची दारु तयार..**

वाहतुक करणे वगैरे स्वरुपाचे १० गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यापैकी ०८ गुन्हे न्यायप्रविष्ट असुन ०२ गुन्हे पोलीस तपासावर आहेत. सदरील इसम हा हातभट्टीच्या दारुची निर्मीती व चोरटा व्यापार करीत असल्याने पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासून करडी नजर होती. सदर इसम हा पोलीसांची नजर चुकवुन हातभट्टीच्या दारुची चोरटी वाहतुक व व्यापार करीत होता. सदर इसमावर यापूर्वी महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ९३ प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा जोमाने हातभट्टीची दारू ताब्यात बाळगुन तिची चोरटी निर्मीती व विक्री करण्याबाबतचे गुन्हे करण्याचे चालुच ठेवुन होता. त्यामुळे पो.स्टे. माजलगांव शहर हद्दीत व परिसरातील सर्वसामान्य नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला होता.

सदर प्रकरणात श्री. विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक ३१.१२.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था व सर्वसामान्य जनतेचे आरोग्य चांगले रहावे हा उदात्त दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हसुल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना पोनि माजलगावं शहर व पो.नि.

पान १ वरून...

स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि. माजलगांव शहर यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत सदर इसमास दिनांक ३१.१२.२०२५ रोजी २१.३५ वा. ताब्यात घेऊन त्याची वैदयकीय तपासणी करुन सदर इसमास दिनांक ०१.०१.२०२६ रोजी योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे हजर करुन स्थानबध्द केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री, नवनीत कॉवत, अपोअ अंबाजोगाई श्रीमती, चेतना तिडके, उविपोअ माजलगांव श्री. शैलेश गायकवाड पो.नि.श्री शिवाजी बंटेवाड, स्थागुशा बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. राहुल सुर्यतळ, सपोनि प्रल्हाद मुंडे, पोउपनि माखने, पोह/महादेव बहीरवाळ, पोह राम भंडाणे, सर्व पो.स्टे. माजलगावं शहर यांचेसह, सपोउपनि अभिमन्यु औताडे, गोविंद राख, बिभीषण चव्हाण स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे समाजकंठक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर, अवैदय जुगार चालविणारे इसमांवर जास्तीत जास्त चझऊ- कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी दिले आहेत.

## ना. पंकजाताई मुंडे शनिवारी परळीत ; विविध कार्यक्रमांना उपस्थिती ; अभ्यागतांनाही भेटणार

परळी ।प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे येत्या शनिवारी (ता. ३) परळीत येत आहेत. ४ तारखेला विविध कार्यक्रम करून अभ्यागतांच्या भेटीसाठी त्या उपलब्ध असणार आहेत अशी माहिती त्यांच्या संपर्क कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.

ना. पंकजाताई मुंडे ३ जानेवारीला संध्याकाळी परळीत येणार आहेत. ४ तारखेला सकाळी ११ वा. प्रसिध्द व्यापारी ओमप्रकाश तापडिया यांच्या शो रूमचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार असून त्यानंतर दोन तास शासकीय विश्रामगृह येथे अभ्यागतांच्या भेटीसाठी त्या उपलब्ध असणार आहेत. सायंकाळी ४ वा. त्या माळाकोळी ता. कंधार कडे रवाना होणार असून तिथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण त्या करणार आहेत अशी माहिती त्यांच्या संपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

# आबा आणि दादांच्या नेतृत्वाखाली शहराच्या विकासाचे नवे पर्व सुरू

## गेवराईकरांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही - बाळराजे पवार

गेवराई ।प्रतिनिधी

विश्वास खूप मोठी आणि जबाबदारीची गोष्ट असून, शहरातल्या नागरिकांनी मोठा विश्वास दाखवला आहे. हा विश्वास जाती - पातीच्या भिंती भेदून विकासाचा मार्ग दाखवणारा असून, गेवराईच्या मतदारांनी टाकलेल्या विश्वासाला कदापी तडा जाऊ देणार नाही. असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी येथे केले. गेवराई शहराने कौल दिला. शहाराच्या सर्वांगीण विकासात आम्ही कमी पडणार नाही. आता, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत विजय मिळवून इतिहास करू, दादा-आबांच्या नेतृत्वाला बळ देण्यासाठी सज्ज व्हा,असे आवाहन माजी मंत्री बदामराव पंडित यांनी येथे बोलताना केले आहे.गेवराई नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी पवार यांचा पदग्रहण समारंभ गुरुवार दि. १ जानेवारी २०२६ रोजी नगर परिषद कार्यालय, येथे मोठ्या उत्साहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री बदामराव पंडित, मुख्याधिकारी विक्रम महाडूरके, माजी सभापती युध्दाजित पंडित, रोहित पंडित, नानी मोटे, अमोल करांडे, भाजपाचे नेते श्रीकांत सानप, शिवराज पवार, ज्येष्ठ नगरसेवक राजेंद्र राक्षसभुवनकर, माजी नगराध्यक्ष सुशिल जवंजाळ, आदित्य बाळराजे पवार, दादासाहेब गिरी, यांच्यासह सर्व नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.

पुढे बोलताना बाळराजे पवार यांनी आपली भूमिका मांडताना सांगितले की, विकास ही एक दिवसात पूर्ण होणारी बाब नसून ती निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेला अधिक गती देण्याचे काम आपण सर्वांनी मिळून करायचे आहे.



गेवराई नगरपरिषदेच्या माध्यमातून शहराचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून कुठेही कमी पडणार नाही. या निवडणुकीत प्रत्येक कार्यकर्त्याने आटोकाट प्रयत्न केले. आबा आणि दादांवर जनतेने दाखवलेला विश्वास हा आमच्यासाठी अभिमानास्पद असला तरी तो एक ‘काटेरी मुकुट’ आहे. सत्तेचा माज न करता, फेटा बांधला आहे. याचे भान ठेवून जबाबदारीने काम करावे लागेल. कारण जनता हीच खरी मालक आहे आणि त्यांच्या अपेक्षांवर खरे उतरावे लागेल. गेवराई शहर अधिक सुंदर, स्वच्छ आणि सुरक्षित करण्याचा निर्धार व्यक्त करताना त्यांनी सांगितले की, आज गेवराई शहरात

### नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ.गीताभाभी बाळराजे पवार यांचा पदग्रहन सोहळा उत्साहात संपन्न

महिलांना रात्री अकरा वाजेपर्यंत बिनधास्तपणे शतपावली करता येते, हेच आमच्या सुरक्षिततेच्या कामाचे द्योतक आहे. हा विश्वास आणखी बळकट करण्यासाठी भविष्यातही आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्यात येतील. राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून गेवराई नगरपरिषदेला यापूर्वीही मोठ्या प्रमाणात निधी मिळाला असून पुढील काळातही अधिकाधिक निधी मिळवण्यासाठी जाणीवपूर्वक मेहनत घेऊन, पाठपुरावा करू. गेवराई च्या जनतेला

स्वप्ने दाखवण्यापेक्षा प्रत्यक्षात शाश्वत व लोकाभिमुख कामे उभी करून दाखवण्यावर आमचा भर राहील, असेही पवार यांनी नमूद केले. नगरपरिषदेच्या सर्वांगीण विकासासाठी पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, स्वच्छता, सार्वजनिक सुविधा आणि इतर पायाभूत सुविधांवर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता आणि लोकसहभाग राखला जाईल. कार्यकर्ते, नगरसेवक आणि अधिकारी यांना एकत्र घेऊन गेवराईचा नवा विकास आराखडा प्रत्यक्षात उतरवण्याचा निर्धार ही शेवटी बाळराजे पवार यांनी व्यक्त केला. माजी मंत्री बदामराव पंडित यांनी आपली भूमिका मांडताना सांगितले की, गेवराईतील बहाद्दर मतदारांनी चांगला कौल दिला. शहाराच्या सर्वांगीण विकासात आम्ही कमी पडणार नाही. आता, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत विजय मिळवून इतिहास करू, दादा-आबांच्या नेतृत्वाला बळ देण्यासाठी सज्ज व्हा,असे आवाहन माजी मंत्री बदामराव पंडित यांनी येथे बोलताना केले आहे. नवनिर्वाचित नगरसेवक माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर यांनी ही भूमिका मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याधिकारी विक्रम महाडूरके, सूत्रसंचालन प्रसिद्ध वक्ते राहुल गिरी यांनी केले. राघव वाव्हळे यांनी सर्व उपस्थितीतांचे आभार मानले. कार्यक्रमास गेवराई शहरातील नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती. ग्रामीण भागातून आलेल्या शेकडो कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवकांना शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती.

# सातारा जिल्ह्यातील वडूज येथील गाजलेल्या जबरी चोरी व अपहरण प्रकरणाचा ऐतिहासिक निकाल




जालना ।प्रतिनिधी

सातारा जिल्ह्यामध्ये प्रचंड खळबळ उडवून देणाऱ्या जबरी चोरी आणि अपहरणाच्या गाजलेल्या प्रकरणाचा निकाल लागला असून वडूज जिल्हा व सत्र न्यायालयाने यातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. पुराव्यांचा अभाव आणि तपासातील त्रुटींमुळे न्यायालयाने आरोपींना मोठा दिलासा दिला आहे.या प्रकरणातील आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३७९ (जबरी चोरी) आणि ३६५ (अपहरण) यांसारख्या गंभीर कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते. यामध्ये खालील आरोपींचा समावेश होता विजय तुकाराम चव्हाण रा.कोकाटे हदगाव,मल्लिकार्जुन देवकाटे रा.विजयपूर,बिरराप्पा रामन्ना खरात रा.कर्नाटक,न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निरीक्षणे जिल्हा व सत्र न्यायालय, वडूज येथील माननीय न्यायाधीशांनी या खटल्याची सखोल सुनावणी घेतली. सुनावणी दरम्यान न्यायालयाने खालील बाबींवर बोट ठेवले: सरकारी पक्षाला आरोप सिद्ध करण्यात आलेले अपयश. साक्षीदारांच्या जबाबातील मोठी तफावत.तपास यंत्रणेने केलेल्या तपासातील कायदेशीर त्रुटी. आरोपींविरुद्ध कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नसणे. ड.विनोद चव्हाण यांची विजयाची' खेळी या खटल्यात आरोपींच्या वतीने जालना जिल्हा व सत्र न्यायालयातील प्रख्यात विधिज्ञ ड. विनोद साहेबराव चव्हाण यांनी बाजू मांडली. त्यांनी तपासातील विसंगती आणि कायदेशीर मुद्द्यांवर अत्यंत अभ्यासपूर्ण व प्रभावी युक्तिवाद केला.ड.चव्हाण यांच्या या ठाम मांडणीमुळेच आरोपींवरील आरोप फेटाळले जाऊन त्यांना न्याय मिळाला अशी चर्चा सध्या न्यायालयीन वर्तुळात रंगली आहे. न्याय व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढया निकालामुळे सत्यमेव जयते या उक्तीचा प्रत्यय आल्याची भावना आरोपींच्या नातेवाईकांनी व्यक्त केली आहे. निरपराध व्यक्तींना न्याय मिळाल्याने सर्वत्र समाधान व्यक्त होत असून आरोपींच्या कुटुंबीयांनी न्यायालय आणि बचाव पक्षाचे वकील ड. विनोद चव्हाण यांचे आभार मानले आहेत.

# मृत्यूलाही हरवून ६ जणांना जीवन देणारा देवदूत धनंजय काळे

जालना ।प्रतिनिधी

मृत्यूच्या दारातूनही जीवनाचा प्रकाश पसरवणारी माणुसकीचा सर्वोच्च आदर्श उभा करणारी हृदयद्रावक घटना जालना येथे घडली आहे. परभणी येथील रहिवासी, अवघे २५ वर्षांचे वैद्यकीय शिक्षण घेत असलेले धनंजय अनंत काळे यांनी मृत्यूनंतरही ६ जणांच्या आयुष्यात नवे प्राण फुंकले. वेदनेतून जन्मलेली ही माणुसकी समाजाला अंतर्मुख करणारी आहे.दि.२९ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता काकडे पेट्रोल पंप समृद्धी टी-पॉईंट परिसरात काळाने धनंजय यांच्यावर घाला घातला.भीषण अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली रक्तस्त्रावाने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली. तात्काळ त्यांना संजिवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल जालना येथे दाखल करण्यात आले.डॉक्टरांनी जीव वाचवण्यासाठी तातडीने क्रॅनिओटोमी शस्त्रक्रिया केली. पण नियतीसमोर सारे प्रयत्न अपुरे ठरले.दि.१ जानेवारी २०२६ रोजी पहाटे वैद्यकीय तपासणीनंतर धनंजय यांना ब्रेन स्टेम डेड घोषित करण्यात आले. ही कटू सत्यता संजिवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ. बळीराम बागल यांनी कुटुंबीयांना समजावून सांगितली. दुःखाचा डोंगर कोसळलेल्या त्या क्षणी, नातेवाईक डॉक्टर डॉ.प्रताप वझरकर तसेच धनंजय यांच्या आई-वडिलांशी अवयवदानाबाबत चर्चा झाली.



डोळ्यांत अश्रू, मनात अपार वेदना तरीही धनंजय यांच्या आई-वडिलांनी आणि कुटुंबीयांनी माणुसकीचा सर्वोच्च निर्णय घेतला.माझा मुलगा गेला असला तरी इतरांचे आयुष्य वाचावे या भावनेतून त्यांनी अवयवदानास संमती दिली.या एका निर्णयाने ६ रुग्णांना नवजीवन मिळाले मृत्यूच्या अंधारात आशेचा दीप प्रज्वलित झाला.६ जणांना जीवन देणारे अवयवदान फुफ्फुस डॉ.डी.वाय.पाटील हॉस्पिटल, पुणे यकृत (लिव्हर) रुबी हॉल क्लिनिक, पुणे एक मूत्रपिंड डॉ. हेडगेवार हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर दुसरे मूत्रपिंड सिग्मा हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर दोन्ही डोळे श्री गणपती नेत्रालय, जालना सर्व अवयवांचे ग्रीन कॉरिडोरद्वारे क्षणाचाही विलंब न लावता सुरक्षित स्थलांतर करण्यात आले. डॉ.डी. वाय. पाटील हॉस्पिटल, रुबी हॉल क्लिनिक, सिग्मा हॉस्पिटल व डॉ. हेडगेवार हॉस्पिटल येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत शासनमान्य प्रक्रियेनुसार अवयव काढण्यात आले.

धनंजय यांचे पार्थिव हॉस्पिटलमधून बाहेर नेत असताना राष्ट्रगीताने सन्मान देण्यात आला. अश्रूंनी डोळे भरलेल्या वातावरणात संपूर्ण परिसर स्तब्ध झाला. यावेळी जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अजय बंसल, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक शेवाळे, पोलीस उपनिरीक्षक आरती जाधव यांच्यासह पोलीस प्रशासन उपस्थित होते.या संपूर्ण मानवीय मोहिमेत संजिवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ. बळीराम बागल, डॉ. शिवदास मिरकर, डॉ. कैलास राजगुरू, डॉ. निशांत गोयल, डॉ. शालिक जाधव, डॉ. अविनाश पोळ, हर्षदा बागल, अमोल कदम तसेच हॉस्पिटलचे सर्व डॉक्टर व कर्मचारी देवदूत ठरले. मृत्यूनंतरही जीवन देणारा धनंजय काळे आज केवळ एक नाव नाही, तर माणुसकीची ओळख बनला आहे. त्यांच्या कुटुंबीयांचा हा निर्णय समाजाला अवयवदानाचे महत्त्व पटवून देणारा मरणानंतरही माणूस जगू शकतो हे सिद्ध करणारा ठरला आहे.

# कल्याण-लातूर द्रुतगती महामार्गाच्या मुद्द्यावर अनिलदादा जगताप यांची थेट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे धाव!

### कल्याण-लातूर द्रुतगती महामार्ग बीड जिल्ह्यातूनच हवा- अनिलदादा जगताप

बीड, प्रतिनिधी - प्रस्तावित मुंबई-हैदराबाद (कल्याण-लातूर) जनकल्याण द्रुतगती महामार्ग हा मूळ आराखड्यानुसारच बीड जिल्ह्यातून व बीड शहराच्या जवळून राबवावा, अशी ठाम मागणी शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना सविस्तर निवेदन दिले आहे.

नुकत्याच नागपूर येथे पार पडलेल्या राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मुंबई-हैदराबाद (कल्याण-लातूर) या महत्त्वाकांक्षी द्रुतगती महामार्गाची घोषणा करण्यात आली. या प्रकल्पाच्या मूळ संकल्पनेनुसार लातूर-अंबाजोगाई-धारूर/केज-बीड-पाटोदा/जामखेड-आष्टी/कडा-अहिल्यानगर मार्गे कल्याण/बदलापूर असा मार्ग प्रस्तावित असून, तो बीड जिल्ह्यातून जाणे अपेक्षित असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हा महामार्ग केवळ दळणवळणाचा मार्ग नसून बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा कणा ठरणार असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले. बीड जिल्ह्यातील दूध, सीताफळ, लिंबू, सोयाबीनसह नाशवंत शेतीमालाला जलद बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी हा महामार्ग अत्यंत उपयुक्त ठरेल. मुंबई, पुणे, कल्याण तसेच जेएनपीटीमार्गे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी थेट संपर्क साधला जाऊन शेतकऱ्यांचा वाहतूक खर्च, वेळ व इंधन बचत होईल, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. तसेच महामार्गालगत औद्योगिक वसाहती, गोदामे, प्रक्रिया उद्योग, लॉजिस्टिक हब उभारणीला चालना मिळून हजारो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. दुष्काळ, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी व स्थलांतराच्या समस्यांनी ग्रस्त असलेल्या बीड जिल्ह्यासाठी हा प्रकल्प विकासाची मोठी संधी असल्याचेही निवेदनात नमूद आहे. हा महामार्ग बीड जिल्ह्यापासून दूर नेण्यात आल्यास जिल्ह्याच्या भविष्यावर अन्याय होईल, अशी भावना शेतकरी, व्यापारी, युवक व नागरिकांमध्ये असल्याचे सांगण्यात



आले.

वेळेत सकारात्मक निर्णय न झाल्यास लोकशाही मार्गाने जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, बीड जिल्ह्यातील जनतेच्या भावना लक्षात घेऊन प्रस्तावित द्रुतगती महामार्ग मूळ नियोजनानुसारच बीड जिल्ह्यातून व बीड शहराच्या जवळून राबविण्याचा तातडीचा निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# पाली येथील शांतीवनात अश्लील चाळे करणाऱ्या तब्बल १५ जोडप्यांना दामिनी पथकाने दिला कारवाईचा दणका

### १५ युवक युवतीवर मुंबई पोलीस अधिनियम ११०/११७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई

बीड ।प्रतिनिधी

दामिनी पथक प्रमूख पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना गुप्तबातमीदारामार्फत माहिति मिळाली की, पाली येथील शांतीवनात बरेच जोडपे फिरत आहेत व अश्लील चाळे करत आहेत. त्यावरून दामिनी पथक हे शांतीवनाकडे रवाना झाले. तिथे पोहोचल्यावर तिथे बरेच जोडपे मिळून आले. त्यांना सर्वांना ताब्यात घेवून दामिनी पथक हे पोस्टे बीड ग्रामीणला आले. त्यांना पोस्टेला हजर करून १५ युवक व युवतींवर मुंबई पोलीस अधिनियम ११०/११७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांचे समुपदेशन करण्यात आले आहे.

सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत सर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली झडख पल्लवी जाधव, सहायक फौजदार मीरा रेडेकर, पोलीस हवालदार शोभा जाधव, उषा चौरे, अशोक शिंदे,पोलीस शिपाई योगेश निर्धार सर्व दामिनी पथक व एएचटीयु बीड यांनी केली.



बीड - महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना दैनिक दिव्य लोकप्रभाचे ज्येष्ठ संपादक संतोष मानूरकर सर, यावेळी वाढळचे ज्येष्ठ संपादक शेखर कुमार आणि दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी.

# मैत्रा फाउंडेशनकडून छाया सरोदे यांना जिजाऊ सावित्रीची लेक पुरस्कार जाहीर

बीड ।प्रतिनिधी

मैत्रा फाउंडेशन, महाराष्ट्र यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्रीमती छाया सरोदे (जिव्हाळा बेघर निवारा, भाजी मंडई, बीड) यांची जिजाऊ सावित्रीची लेक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. २०२५-२६ या वर्षात वृद्ध, अपंग, वंचित महिला तसेच अनाथ बालकांसाठी अविरतपणे करत असलेल्या सेवाभावी कार्याची आणि समर्पणाची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन शुक्रवार, दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता जिव्हाळा बेघर निवारा, भाजी मंडई, बीड येथे करण्यात आले आहे.मैत्रा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. द. ल. वारे, राज्य व जिल्हा पदाधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे.छाया सरोदे यांच्या निवडीबद्दल सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या कार्याला हा पुरस्कार नवी प्रेरणा देणारा ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.



# जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात पत्रकार शेख आयेशा यांचा वाढदिवस साजरा

## सामाजिक कार्याचा वसा घेतलेल्या पत्रकारितेतील सावित्री म्हणजेच शेख आयेशा मॅडम होय - फौजदार वासुदेव मिसाळ





**बीड ।प्रतिनिधी**


**पत्रकारिताक्षेत्रामध्ये खऱ्या अर्थाने सामाजिक कार्याचा खडतर वसा पत्रकार शेख आयशा मॅडम यांनी घेतला आहे.सातत्याने उपेक्षित, वंचित आणि तृतीयपंथीयांसाठी त्यांचे सुरू असलेले सामाजिक कार्य आदर्शवत असून त्यांनी आपला स्वतःचा वाढदिवस जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात साजरा करून इतरांसमोर एक चांगला आदर्श निर्माण केला आहे असे प्रतिपादन शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे फौजदार वासुदेव मिसाळ यांनी केले.**

बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथे लोकजगतच्या संपादक शेख आयेशा रफिक यांचा वाढदिवस केंद्रातील बेघर लाभार्थ्यांना गोड जेवण देऊन सामाजिक उपक्रमांनी १ जानेवारी रोजी साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संपादक तथा पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासह पत्रकार शेख आयुब,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश गंगाधरे, ज्येष्ठ संपादिका प्रतिभा गणोरकर, नयना भाकरे, डॉ. संजय तांदळे, शेतकरी संघटनेचे करपे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार गौतम भालेराव, अफसाना शेख तसेच जिव्हाळा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, मुख्य व्यवस्थापक राजू वंजारे,काळजीवाहक छाया सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सर्व मान्यवरांनी पत्रकार शेख आयेशा रफिक यांना वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करून आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा केल्याबद्दल कौतुक केले. या कार्यक्रमास जिल्हाभरातून पत्रकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तृतीयपंथी शीतल साठे यांचा देखील वाढदिवस बेघर केंद्रात साजरा

तृतीयपंथीयांच्या प्रश्नांवर त्यांना न्याय देण्यासाठी निस्वार्थ भावनेने काम करत असलेल्या पत्रकार शेख आयेशा रफिक यांनी आपल्या सोबत या ठिकाणी तृतीयपंथी असलेल्या शितल साठे यांचा देखील वाढदिवस साजरा केला.आणि यापुढे या बेघर निवारा केंद्रात तृतीयपंथी देखील रस्त्यावर निधी मागून या ठिकाणी बेघर निवारा केंद्रातील निराधारांचे पोट भरण्यासाठी आपल्या वाढदिवसा दिवशी जेवण देऊन वाढदिवस साजरा करतील असे शितल साठे यांनी जाहीर करत तृतीयपंथीयांनी देखील पत्रकार वैभव स्वामी यांच्या जाहीर आवाहनानंतर सामाजिक दायित्व स्वीकारून एक आदर्श संकल्प केला.

### पत्रकारांनी जिव्हाळा बेघर केंद्र दत्तक घ्यावे - पत्रकार वैभव स्वामी



ज्यांना स्वतःच्या हक्काचे छत नाही, रक्ताचे नातेवाईक सांभाळत नाहीत अशा बेघर निराधारांना सांभाळण्याचे त्यांना स्वाभिमानाने जगवण्याचे अवघड काम जिव्हाळा बेघर निवारा केंद्र हे कोणत्याही शासनाच्या अनुदानाशिवाय दानशूर यांच्या मदतीने करत आहेत. हे काम अतिशय अवघड असल्यामुळे त्यांच्या या कार्याला मदत म्हणून बीड शहरासह जिल्ह्यातील पत्रकारांनी आपला स्वतःचा वाढदिवस आपल्या कुटुंबातील वाढदिवस अथवा पुण्यतिथी या ठिकाणी येऊन साजरी करावी.त्याचबरोबर आपले सर्व क्षेत्रात असलेले चांगले संबंध या विधायक कार्यासाठी उपयुक्त करून या निराधारांना दोन वेळचे पोटभर जेवण मिळेल यासाठी सामाजिक दायित्व म्हणून भविष्यात जबाबदारी घ्यावी असे आवाहन करून पत्रकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा मॅडम यांनी आपला स्वतःचा वाढदिवस नववर्षाच्या शुभारंभ दिनी या बेघर निवारा केंद्रात करून आदर्श निर्माण केला आहे. त्यांचा आदर्श बीड जिल्ह्यातील पत्रकारांनी घ्यावा असे आवाहन याप्रसंगी केले.

# आधुनिक केसरी माध्यम समूहाच्या एडिटोरिअल बोर्ड चेअरमनपदी वसंत मुंडे यांची निवड



छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

केसरी माध्यम समूहाने गुणवत्ता, वैचारिक स्पष्टता आणि विश्लेषणात्मक पत्रकारिता अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेल्या राज्यस्तरीय एडिटोरिअल बोर्ड चेअरमनपदी ज्येष्ठ पत्रकार वसंत मुंडे यांची निवड करण्यात आली आहे. पत्रकारिता क्षेत्रातील दीर्घ अनुभव आणि निर्भीड, वस्तुनिष्ठ व लोकाभिमुख पत्रकारितेसाठी वसंत मुंडे ओळखले जातात. केसरी वृत्तसमूहासाठी हे महत्वाचे पाउल ठरणार आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील केसरी माध्यम समूहाच्या कार्पोरेट कार्यालयात राज्यस्तरीय संपादक मंडळाची पहिली बैठक मुख्य संपादक धनंजय लांबे यांच्या उपस्थितीत झाली. या वेळी संपादक मंडळातील, जेष्ठ संपादक डॉ. अनिल फळे, रवींद्र चिंचोलकर, राजेंद्र शहापूरकर, विजय पाठक, तहसिन खान, डॉ. प्रभू गोरे आदी उपस्थित होते.तर ज्येष्ठ संपादक श्री सुनील पाटील,श्री शाम जैन, श्री दिलीप राठी,श्री सतीश कुलकर्णी,श्री सुनील क्षीरसागर,श्री प्रा.प्रकाश शिरसाट,श्री दिलीप महालिंगे यांचा एडिटोरियल बोर्डात सामावेश आहे.

केसरी वृत्तसमूहाने पाच वर्षापासून डिजिटल आणि प्रिंट माध्यमांत आपली विश्वासार्हता अधिक दृढ केली आहे. तर माध्यम क्षेत्राच्या इतिहासात पहिल्यांदाच विविध विचारांच्या ज्येष्ठ संपादकांचे राज्यस्तरीय संपादक मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळाचे माध्यमक्षेत्रासह समाजातील सर्वांनी उत्स्फूर्त स्वागत केले. या मंडळाच्या माध्यमातून राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, शेती, सहकार, उद्योग आणि संस्कृती अशा विविध विषयांवर सखोल, अभ्यासपूर्ण व निष्पक्ष मांडणी केली जात आहे.

संपादक मंडळाच्या पहिल्या बैठकीत सर्वानुमते ज्येष्ठ पत्रकार वसंत मुंडे यांची एडिटोरिअल बोर्ड चेअरमनपदी निवड करण्यात आली. आता वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली हे संपादक मंडळ केसरी वृत्त समूहाच्या पत्रकारितेला नवी दिशा देईल, वाचकांचा विश्वास अधिक दृढ करेल आणि मूल्याधिष्ठित पत्रकारितेचा आदर्श निर्माण करेल, असा विश्वास माध्यम समूहाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

**नवा प्रयोग, दिशादर्शक ठरेल : वसंत मुंडे**

प्रसार माध्यमांचे स्वरूप झपाट्याने बदलत असल्याने माहितीच्या कोलाहलात सत्य शोधण्याचे आवाहन उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत अनुभवी ज्येष्ठ संपादकांचे राज्यस्तरीय संपादक मंडळ स्थापन करून लोकांना, प्रिंट आणि डिजिटल च्या एकाच प्लॅटफॉर्मवर विश्लेषणात्मक माहिती देण्याचा प्रयत्न यशस्वी होईल आणि दिशादर्शक ठरेल, असा विश्वास वसंत मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

# कार खरेदीचा बहाणा करुन कार लुबाडणारी टोळी उघडकीस

## बीड शहर पोलिसांनी अमरावती येथून दोन आरोपींना केली अटक



बीड ।प्रतिनिधी

कार खरेदी करण्याचा बहाणा करून वाहन मालकांची फसवणूक करणारी टोळी बीड शहर पोलिसांनी उघडकीस आणली आहे. या प्रकरणात अमरावती येथील दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांनी कार खरेदीच्या नावाखाली वाहन ताब्यात घेऊन ती परत न करता फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

फिर्यादी सचिन आसाराम बोराडे, राहणार माळीवेस बारादरी बीड, कडून त्याच्या मालकीची स्विफ्ट डिझायर कार, कार खरेदी करण्याचा बहाणा करून आरोपींनी सुरुवातीला काही रक्कम ॲडव्हान्स स्वरूपात दिली. उर्वरित पैसे कागदपत्रे तयार करून आणतो, आणि राहिलेले श्रीराम फायनान्स चे सर्व हप्ते भरतो अशी बतावणी केली, असे सांगून त्यांनी कार ताब्यात घेतली. मात्र, वाहनाच्या कागदपत्रांवर कोणतीही कायदेशीर सही करण्यात आली नाही तसेच उर्वरित रक्कमही दिली गेली नाही. त्यानंतर सदरील कार परत न करता आरोपी फरार झाले.

या संदर्भात फिर्यादीकडून तक्रार दाखल झाल्यानंतर बीड शहर पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. तपासादरम्यान अमरावती येथील गुड्डू खान रेहमत खान वय ४० वर्षे, राहणार बिस्मिल्ला नगर, लाल खडी रोड, अमरावती आणि अब्दुल राजीक अब्दुल सादिक वय ४३ वर्षे, राहणार इदगाह गेट, हैदरपूर, अमरावती या दोघांना अटक करण्यात आली आहे.

प्राथमिक तपासात सदरील कारचा वापर गोवंश चोरीसाठी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. सदरील कार अमरावती ग्रामीण येथील बेनवडा पोलीस स्टेशन हद्दीत जप्त करण्यात आलेली असून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की वाहन विक्री करताना अत्यंत दक्षता घ्यावी. केवळ जास्त किंमत देत आहे म्हणून कोणाच्याही ताब्यात वाहन देऊ नये. मध्यस्थामार्फत व्यवहार केला जात असला तरी समोरच्या व्यक्तीची संपूर्ण खात्री पटल्याशिवाय वाहन सुपूर्द करू नये. संपूर्ण रक्कम प्राप्त होऊन वाहनाची कायदेशीर नोंदणी व हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय वाहन विक्री करू नये, अन्यथा सदरील वाहन परत मिळण्याची शक्यता कमी असून ते गुन्हेगारी कृत्यासाठी वापरले जाण्याचा धोका असतो.

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. शीतलकुमार बल्लाळ, पोलीस जमादार बबन जाधव व पोलीस अंमलदार संजय राठोड यांनी केली आहे.

# पेठ बीड पोलीसांची यशस्वी कारवाई

## घरफोडी गुन्हा तात्काळ उघडकीस आणत आरोपीतांकडुन ४,४०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत



बीड ।प्रतिनिधी

दिनांक:- ०३/१२/२०२५ रोजी फिर्यादी नामे दत्ता गंगाधर जगदाळे वय ४३ वर्षे व्यवसाय शेती रा. साखरे बोरगांव ता.जि.बीड यांनी फिर्याद दिली की, दिनांक ०२/१२/२०२५ ते दिनांक ०३/१२/२०२५ रोजीचे ०९.३० ते १०.०० वाजता पावेतो. नवीन मोढा बीड परीसरातील तिरुमला हेअर ऑईल कंपनीचे शटर कापुन आत प्रवेश करुन कंपनी मधील ५०क्झ क्षमतेच्या इंन्डक्शन कंपनीच्या तीन इलेक्ट्रीक मोटार प्रती किंम ती १,५०,०००/- रुपये प्रमाणे एकूण ४,५०,०००/-रुपये व २५-क्झ क्षमतेच्या इंन्डक्शन कंपनीच्या दोन इलेक्ट्रीक मोटार प्रती किंमती ७०,०००/- रुपये प्रमाणे एकुण १,४०,०००/- रुपये असा एकूण ५,९०,०००/- रुपयेचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याचे तक्रारी वरुन पोलीस ठाणे पेठ बीड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलीस ठाणे पेठ बीड येथील अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयातील गेला माल व आरोपीचा शोध घेतला असता आवघ्या दोन तासात घरफोडी गुन्ह्यातील आरोपी नामे १) किशोर भगवान मस्के वय ३६ वर्षे रा.हनुमान नगर पेठ बीड, २) मयुर गोरख चांदणे वय २१ वर्षे रा. चांदण्याचा वाडा पेठ बीड यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडुन गुन्ह्यातील गेला माल पैकी दोन इलेक्ट्रीक मोटार किंमती १,४०,०००/- रुपयेच्या जप्त केल्या.ही धाडसी कारवाई पेठ बीड पोलिसांनी केली.

त्यानंतर गुन्ह्याचा अधिक तपास करुन सदर गुन्हयातील इतर तीन आरोपी १) अविनाश कल्याण धुरंधरे वय ३५ वर्ष २) गोपी ऊर्फ बाळा एकनाथ चांदणे वय ३० वर्ष, ३) विपुल उत्त्म गायकवाड वय ४० वर्ष सर्व रा. चांदण्याचा वाडा पेठ बीड, यांना अटक करुन त्यांचे कडुन दोन इलेक्ट्रीक मोटार ३,००,०००/- रुपये असा एकुण ४,४०,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर गुन्ह्यात सराईत गुन्हेगार नामे भिमा लक्ष्मण मस्के रा.वतारवेस पेठ बीड याचे नाव निष्पंन् असुन त्यास अटक करणे बाकी आहे. सदर आरोपीतांचा गुन्ह्यांचा अभिलेखाची पाहणी केली असता आरोपी हे वारंवार संघटीत पणे गुन्हे करण्याचे सवईचे असुन त्यांचेवर मालाविरुध्दचे अनेक गुन्हे दाखल असल्याने त्यांचेवर भारतीय न्याय संहीतीचे नवीन सुधारीत संघटीत गुन्हेगारीचे कलम ११२ प्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलिस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, मा. अपर पोलिस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, मा. उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती. पुजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, सपोनि.श्री. नित्यानंद उबाळे, पोउपनि. श्री.मन्सुर शहा, पोह/नितीन राठोड, पोह/सुभाष मोठे, पोह/ अजित शिकेतोड, पोअं/औदुंबर गिरी, पोअं/पांडुरंग परजणे, पोअं/कल्याण जाधव सर्व नेमणुक पोलीस ठाणे पेठ बीड यांनी केली असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि, श्री. मन्सुर शहा पोलीस ठाणे पेठ बीड हे करीत आहेत.

# वीज कनेक्शन हमखास वेळेत मिळण्यासाठी महावितरणची नवी व्यवस्था

बीड : ग्राहकाने अर्ज केल्यानंतर महानगरांमध्ये तीन दिवसात, शहरांमध्ये सात दिवसात आणि ग्रामीण भागात १५ दिवसात नवे वीज कनेक्शन देण्याच्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कालमर्यादेची तंतोतंत अंमलबजावणी करण्यासाठी महावितरणने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यपद्धतीत बदल केला आहे. त्यामुळे ग्राहकांना वीज कनेक्शनसाठी वाट पहावी लागणार नाही, असा विश्वास महावितरणच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

महावितरणकडून मुंबईचा काही भाग वगळता संपूर्ण राज्यात वीज पुरवठा सेवा दिली जाते. ग्राहकांना नव्या वीज कनेक्शनसाठी ऑनलाईन अर्ज करता येतो. अर्जासोबत दाखलेही जोडता येतात. महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून अर्जाची व कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर ग्राहकाला शुल्क भरण्याची सूचना दिली जाते. ग्राहकाने पैसे भरले की, नवा मीटर जोडून ग्राहकाला वीज कनेक्शन दिले जाते.सध्याची ही पद्धती अर्ज केल्यापासून नवे कनेक्शन दिल्याची यंत्रणेत नोंद होण्यापर्यंत पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आली आहे. यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक टप्प्यावर देखरेख करण्यात येत आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना हमखास आयोगाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेत नवी जोडणी मिळण्याचा विश्वास महावितरणच्या प्रशासनाला वाटतो.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नवीन वीज कनेक्शनसाठी अर्ज केल्यानंतर महानगरांसाठी तीन दिवस, शहरांसाठी सात दिवस आणि ग्रामीण भागात १५ दिवसात कनेक्शन देण्याची तरतूद केली असली तरी ती जेथे पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, त्यासाठी ही कालमर्यादा आहे. विजेचे खांब उभारून व तारा जोडून वीज पुरवठा उपलब्ध करण्यासारखी पायाभूत सुविधांची कामे गरजेची असतील तर तेथे ९० दिवसात वीज जोडणी देण्याची कालमर्यादा आयोगाने निश्चित केली आहे.नव्या वर्षात सुरुवात - महावितरणच्या प्रशासनाने केलेल्या सुधारणेमुळे नवीन वीज कनेक्शन देण्याच्या कामात गतीमानता येईल आणि अधिक पारदर्शकता येईल, असाही विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. नवे वीज कनेक्शन देण्याच्या बाबतीत महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कोठे दिरंगाई होत असेल तर माहिती तंत्रज्ञानामुळे नेमक्या कोणत्या टप्प्यावर विलंब झाला हे समजेल. परिणामी एकूण प्रक्रियेची गती वाढविणे शक्य झाले आहे. महावितरणची ही व्यवस्था १ जानेवारी २०२६ पासून सुरू झाली आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).